क्रमांक:जशिअ-२०१६/प्र.क्र.६५४/जल-७

मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
महाराष्ट्र

Additional Chief Secretary to
Chief Minister
Maharashtra

दि. ९/०२/२०१७.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

**विषय : जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये जिल्हा नियोजन विकास निधीमधून पुरेशी तरतूद करण्याबाबत.**

राज्यात वारंवार पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी "सर्वांसाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९" हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी "जलयुक्त शिवार अभियान" हा अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम शासनाने दिनांक ५ डिसेंबर २०१४ रोजी सुरु केला आहे. या अभियानासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून १० टक्के व स्थानिक आमदार विकास निधीतून रु. २० लाख मर्यादेपर्यंत निधी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिनांक ११.०३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दिल्या आहेत.

जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ मध्ये निवडलेली कामे पूर्ण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन दिलेल्या जिल्ह्याच्या आढावा घेतला असता, जिल्हाधिकारी पालघर, सिंधुदुर्ग, सोलापूर व नाशिक व औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांनी ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षाही अधिक निधी जलयुक्त शिवार कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे या सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त, नाशिक व औरंगाबाद अभिनंदनास पात्र आहेत. तसेच रायगड, पुणे, अमरावती, अकोला व यवतमाळ या जिल्ह्याधिकाऱ्यांनी निश्चित करण्यात मर्यादेच्या ५० ते ८० टक्के एवढा निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे त्यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या पुढील बैठकीत पुर्ननियोजनाद्वारे पूर्ण निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.

तथापि जिल्हाधिकारी ठाणे, रत्नागिरी, सातारा, सांगली, कोल्हापूर व पश्चिम विदर्भातील तिव्र दुष्काळ असलेले बुलढाणा व वाशिम व नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी अत्यंत अपूरा निधी जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिला आहे. त्यांची ही कृती असमाधानकारक आहे. त्यामुळे जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या पुढील बैठकीमध्ये पुर्ननियोजनाद्वारे ३१ मार्च २०१७ पर्यंत पूर्ण निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी जिल्हा आढावा बैठकीत समक्ष सूचना दिल्या आहेत, याची नोंद घ्यावी.

(प्रविण परदेशी)
मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

प्रत : अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रत : सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रत : विभागीय आयुक्त, नाशिक व औरंगाबाद यांना माहितीसाठी.
प्रत : विभागीय आयुक्त, अमरावती, नागपूर, कोंकण व पुणे यांना उचित कार्यवाहीसाठी.